मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ । पान १


# आगामी १५ दिवसांत लोकसभा निवडणूक आचारसंहिता?

## विश्वसनीय सूत्रांची माहिती : पदाधिकारी, कार्यकर्ते 'अलर्ट'

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अयोध्येतील राम मंदिर उद्घाटन सोहळा, नुकताच जाहीर झालेला केंद्रीय अर्थसंकल्पाद्वारे सर्वसामान्य नागरिकांना आकर्षित केले असून, त्या सकारात्मक वातावरणाचा फायदा घेत लोकसभा निवडणूक-२०२४ चे रणशिंग फुंकण्याची तयारी करण्यात आली आहे. २०२३-मध्ये झालेल्या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने तीन राज्यात मोठा विजय मिळवल्यानंतर भाजपचे नेते व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचा वातावरण होते. त्यात अयोध्येतील राममंदिराच्या उद्घाटनानंतर भाजपा आणि घटक पक्षांतील नेत्यांचा विश्वास दुनावला आहे. दरम्यान, राज्यातील भाजपाच्या एका बड्या नेत्याच्या उपस्थितीमध्ये सर्व आमदार, पदाधिकारी आणि नेत्यांची गुप्त बैठक झाली आहे. त्यामध्ये आगामी १५ दिवसांत लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागण्याचे संकेत संबंधित नेत्याने दिले आहेत.विशेष म्हणजे, भाजपाकडून सर्व आमदारांना 'नमो ॲप टार्गेट' देण्यात आले आहे. राज्यात ५० लाख नमो ॲप डाऊनलोड




करुन घेण्याच्या सूचना आमदरांना देण्यात आल्या आहे. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघात किमान ३० हजार ॲप डाऊनलोड करुन घ्यावेत. आमदारांनी रोज सकाळी किमान ५ मिनिटं नमो ॲप वर घालवावीत, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशन ९ फेब्रुवारी रोजी संपणार आहे. अर्थसंकल्पाप्रमाणेच या अधिवेशनामध्ये मोदी सरकार मतदारांना आकर्षित करण्यासाठी मोठी घोषणा करण्याची शक्यता आहे. त्यानंतर १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणूक आचारसंहिता जाहीर होण्याची दाट शक्यता आहे.

### मावळमधून उमेदवारीसाठी रस्सीखेच

» मावळ लोकसभा मतदार संघात शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे हे आगामी निवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवारीचे प्रमुख दावेदार राहणार आहेत. मात्र, भाजपाचे माजी मंत्री बाळा भेगडे आणि शहराध्यक्ष शंकर जगताप या मतदार संघातून इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीकडून माजी महापौर संजोग वाघेरे यांनी मतदार संघात दौरे वाढवले आहेत.

### शिरुरमधून उमेदवार कोण?

» महायुतीच्या उमेदवारीबाबत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, भाजपाचे आमदार महेश लांडगे ही दोन प्रमुख नावे चर्चेत आहेत. हा मतदार संघ राष्ट्रवादीला सोडल्यास कॅबिनेट मंत्री दिलीप वळसे-पाटील लोकसभा निवडणुकीचे उमेदवार होतील. दुसरीकडे, महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना पुन्हा मैदानात उतरवले जाणार की, शरद पवार भाकरी फिरवणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पार्श्वगायक शांतनू मुखर्जी यांना 'आशा भोसले' पुरस्कार जाहीर

## सन्मान चिन्ह, एक लाख अकरा हजार रुपये रोख, शाल असे पुरस्काराचे स्वरूप

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा आणि पिंपरी-चिंचवड कलारंग प्रतिष्ठानच्या सहयोगाने व सिद्धिविनायक ग्रुप पुरस्कृत यंदाचा 'आशा भोसले पुरस्कार' प्रसिद्ध पार्श्वगायक, संगीतकार शांतनू मुखर्जी (शान) यांना जाहीर झाला आहे. सन्मान चिन्ह, एक लाख अकरा हजार रुपये रोख, शाल असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे यंदा २४ वे वर्ष आहे.नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी याबाबतची माहिती दिली. उपाध्यक्ष किरण येवलेकर, प्रमुख कार्यवाहक सुहास जोशी, कोषाध्यक्ष राजेंद्र बंग, सदस्य नरेंद्र आमले यावेळी उपस्थित होते. चिंचवड भोईरनगर



येथील कामगार कल्याण मैदानात ११ फेब्रुवारी २०२४ रोजी पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. जेष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांची पुरस्कार सोहळ्यास प्रमुख उपस्थिती असणार आहे.भाऊसाहेब भोईर म्हणाले की, गेल्या २४ वर्षांपासून जेष्ठ गायिका आशा भोसले यांच्या नावाने 'आशा भोसले पुरस्कार' दिला जातो. आजपर्यंत गानकोकिळा लता मंगेशकर, खय्याम, रविंद्र जैन, बप्पी लहरी, प्यारेलालजी, आनंदजी, हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनु मलिक, शंकर महादेवन, पंडित शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर, हरीहरन, सोनू निगम, सुनिधी चौहान, पद्मभूषण उदित नारायण, रुपकुमार राठोड, अवधूत गुप्ते आणि सलील कुलकर्णी आदींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शान यांनी आजवर केलेल्या संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना यंदाचा पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी शान यांच्या गीतांवर आधारित मधुमेह निर्मित मधुसूदन ओझा प्रस्तुत रजनीगंधा हा कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य सादर केला जाणार आहे. शहरातील रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन भोईर यांनी केले आहे.

# पीएमआरडीए विकास आराखड्यात गैरकारभार!

## महानगर नियोजन समितीच्या सदस्यांचा आरोप



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रारूप विकास आराखडा तयार करून प्रसिद्धीसाठी महानगर नियोजन समितीकडे (एमपीसी) सादर करणे आवश्यक असताना देखील पीएमआरडीने त्यांच्या स्तरावर विकास आराखडा बेकायदेशीरपणे प्रसिद्ध केला. त्यावरील हरकती व सूचना प्राप्त करून घेऊन त्यांना नियुक्त समितीपुढे सुनावणी न देता समितीमधील एका एका सदस्यासमोर हरकतदारांना सुनावणी देण्यात आली. त्या विरोधात एमसीपीच्या सदस्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने पूर्वीच्या आदेशावर स्थगिती कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे पीएमआरडीएला विकास आराखडयाबाबत कार्यवाही करता येत नाही. तरीही त्यावर कार्यवाही सुरू असून, त्यात गैरव्यवहार झाला आहे, असा आरोप महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत भसे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेस समितीचे सदस्य सुखदेव तापकीर, दीपाली हुलावळे, तसेच, संतोष भेंगडे, प्रियंका भेंगडे-पठारे आदी या वेळी उपस्थित होते.

वसंत भसे यांनी सांगितले की, पीएमआरडीए ला विकासासाठी प्रारूप योजना तयार करण्याचे अधिकार एमपीसी समितीला कलम २४३ झेड ई (१) अन्वये देण्यात आले आहेत. एमपीसीमध्ये किमान २/३ (दोन तृतियांश) सदस्य हे लोकनियुक्त असणे आवश्यक आहे. पुणे महानगर क्षेत्र सन १९९९ मध्ये घोषित केले. एमपीसीने पुणे महानगर क्षेत्रासाठी विकास आराखडा तयार करताना एकही लोकनियुक्त प्रतिनिधी न घेता एमपीसीने प्रारूप विकास आराखडा तयार करण्याचे बेकायदेशीरपणे निर्देश ८ जुलै २०१६ ला तत्कालिन पीएमआरडीला दिले.पीएमआरडीएने प्रारूप विकास आराखडा तयार करून प्रसिद्धीसाठी एमपीसीकडे सादर करणे आवश्यक असताना देखील पीएमआरडीने त्यांच्या स्तरावर २ ऑगस्ट २०२१ रोजी विकास आराखडा बेकायदेशीरपणे प्रसिद्ध केला. त्यावरील हरकती व सूचना प्राप्त करून घेऊन त्यांना नियुक्त समितीपुढे सुनावणी न देता समितीमधील एका एका सदस्यासमोर हरकतदारांना सुनावणी देण्यात आली. पीएमआरडीएकडे प्राप्त हरकती व सुचनांवर झालेल्या सुनावणीवर नियुक्त समितीने घेतलेले निर्णय एमपीसीसमोर सादर न करता पीएमआरडीएने त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊन त्यावर एमपीसीची मान्यता घेण्यासाठी २४ जानेवारी २०२४ रोजी बैठक आयोजित केली होती. मात्र, त्याबाबत एमपीसी सदस्यांनी हरकत घेत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

### कार्यवाहीस स्थगिती दिली आहे

» एमपीसीमध्ये लोकनियुक्त सदस्य नसताना पीएमआरडीएने तयार केलेल्या विकास आराखड्याबाबत एमपीसीमधील लोकनियुक्त सदस्यांनी विकास आराखडा रद्द करण्यासाठी जानेवारी २०२३ ला याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेवर उच्च न्यायालयाने विकास आराखड्याबाबत कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. असे असताना प्रारूप विकास आराखडा एमपीसीच्या मान्यतेसाठी २४ जानेवारी २०२४ रोजीच्या बैठकीत मंजुर करण्याचे नियोजन केले होते. त्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यापूर्वी विकास आराखड्याबाबत कायदेशीर महिती देण्यासाठी २३ जानेवारी २०२४ च्या पत्रानुसार पीएमआरडीएकडे माहिती देण्याची विनंती केली होती. ती महिती जाणीवपूर्वक अद्यापपर्यंत देण्यात आलेली नाही.

# शिवसेनेचा सोमवारी आकुर्डीत जनता दरबार

## अंबादास दानवे, सचिन अहिर यांची उपस्थिती

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** सामान्य शेतकरी, शेतमजूर, निराधार दिव्यांग नागरिकांच्या आणि जिल्हाधिकारी, तहसील, कृषी, महावितरण कार्यालयातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत पिंपरी चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सोमवारी (दि.५) रोजी जनता दरबार आयोजित करण्यात आला आहे.सोमवारी (दि.५) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत, खंडोबा मंदिर सभामंडप, खंडोबा माळ, आकुर्डी येथे होणाऱ्या या जनता दरबारात पुणे जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सचिन आहेर, मावळ संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड मावळ संपर्कप्रमुख लतिका पाष्टे, पिंपरी चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे




पक्ष शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ नेते एकनाथ पवार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, अनिताताई तुतारे, शहर युवा अधिकारी चेतन पवार, उपजिल्हाप्रमुख वैशाली मराठे तसेच निलेश मुटके, धनंजय आल्हाट, तुषार नवले, अनंत कोऱ्हाळे, रोमी संधू, हाजी मणियार दस्तगीर, डॉ. वैशाली कुलथे, कल्पना शेटे, तुषार नवले, मिनल यादव, रेखा दर्शिले, अमित गावडे आदींसह पक्षाचे सर्व पदाधिकारी, युवा सेना, महिला आघाडी, सर्व अंगीकृत संघटना, विभाग प्रमुख आणि शिवसैनिक उपस्थित राहणार आहेत.

घटनाबाह्य पद्धतीने अस्तित्वात असणारे राज्य सरकार जनतेचे प्रश्न सोडवण्या ऐवजी शासन आपल्या दारी नुसतीच बात करत आहेत. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेतृत्व जनतेस साथ देणार आहे असा विश्वास नागरिकांना आहे त्यामुळे आपले प्रश्न घेऊन नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन ॲड. सचिन भोसले यांनी केले आहे.


# राज कपूर हे भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेले सुंदर स्वप्न : राज्यपाल बैस

## सुवर्णयुगात यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** कपूर कुटुंबाने आपल्या कर्तृत्वाने हिंदी चित्रपटसृष्टीच्या विकासात आणि उत्कर्षात मोलाचे योगदान दिले आहे. राज कपूर हे भारतीय चित्रपटसृष्टीला पडलेले सुंदर स्वप्न आणि चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजविणारे कलाकार होते, असं राज्यपाल रमेश बैस यांनी प्रथम 'विश्व राजकपूर सिनेरत्न गोल्डन पुरस्कार' वितरण करताना म्हणाले.श्री ज्ञानेश्वर वर्ल्ड पीस डोम येथे आयोजित माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी पुणे तर्फे





देण्यात येणारा प्रथम 'विश्व राजकपूर सिनेरत्न गोल्डन पुरस्कार' वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यपाल रमेश बैस म्हणाले, भारतीय चित्रपट क्षेत्राच्या सुवर्णयुगात राज कपूर यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला. राज कपूर यांनी आपल्या बहारदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत अनेक वर्षे रुपेरी पडद्याची शोभा वाढविली. विविधरंगी भूमिकांद्वारे त्यांनी प्रेक्षकांना हसविले, रडविले आणि प्रेम दिले. चित्रपटांच्या माध्यमातून त्या काळातील सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला. बैस पुढे म्हणाले, त्यांच्या काळात भाषा आणि सांस्कृतिक विविधतेवर मात करत समाजातील विविध घटनांची पार्श्वभूमी असलेल्या चित्रपटांनी समाजाला एकजूट केले होते. सामान्य माणसाशी जोडल्या गेलेल्या त्यांच्या भूमिकांमधून सामान्य माणसाच्या आकांक्षा, त्याचा संघर्ष आणि सन्मान प्रतिबिंबीत झाला आहे. भारतासह रशिया, इजिप्त, मध्य पूर्व आशिया तसेच दक्षिण अमेरीकेतही त्यांचे चित्रपट गाजले. या पुरस्कारामुळे स्व. राज कपूर यांच्या स्मृती चिरंतन राहतील, असे त्यांनी सांगितले.पृथ्वीराज कपूर यांच्यानंतरही कपूर कुटुंबातील अनेक सदस्यांनी चित्रपट क्षेत्रात मोलाची

### चित्रपटांनी समाजाला एकजूट केले

» देशातील बदलत्या सामाजिक प्रश्नांचे आणि घटनांचे प्रतिबिंब त्या काळातील चित्रपटात दिसून येत होते. याच काळात राष्ट्रीय एकता बळकट करण्याचे महत्वाचे कार्य भारतीय चित्रपटांनी केले, असे राज्यपाल म्हणाले. चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्राच्या सुवर्ण युगाचा साक्षीदार असल्याचे समाधान आपल्याला लाभले असून स्व.राज कपूर यांच्या अभिनयाचा चाहता असल्याचेही बैस यावेळी म्हणाले. राज्यपाल रमेश बैस म्हणाले, भारतीय चित्रपट क्षेत्राच्या सुवर्णयुगात राज कपूर यांच्यासारख्या महान कलाकाराचा उदय झाला.

कामगिरी केली आहे. या कुटुंबातील सदस्यांनी किमान ३०० पेक्षा अधिक चित्रपटात अभिनय, निर्मिती, दिग्दर्शनाचे कार्य केले. भारतीय चित्रपटांच्या सुवर्णयुगात पृथ्वीराज कपूर आणि राज कपूर यांच्यासह अनेक अभिनेते, अभिनेत्री, संगीतकार, कथा लेखक आणि गीतकारांनी केलेले कार्य स्मरणीय आहे. रचनात्मक आणि कलात्मक अभिव्यक्तीचा तो काळ होता.चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्राच्या सुवर्ण युगाचा साक्षीदार असल्याचे समाधान आपल्याला लाभले असून स्व.राज कपूर यांच्या अभिनयाचा चाहता असल्याचेही बैस यावेळी म्हणाले.

# वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर हाजीर हो!

## ज्योती कदम यांना हजर राहण्याबाबत समन्स बजावण्यात आले

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी हिंसाचार झाला होता. या प्रकरणी निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती जे. एन. पटेल आणि निवृत्त मुख्य सचिव सुमित मलिक असा दोन सदस्यीय आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगाकडून मुंबई आणि पुण्यात उलटतपासणी घेण्यात येत आहे. त्याकरिता विविध राजकीय नेते, प्रशासनातील



अधिकारी, या भागातील ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य आदी विविध जणांची साक्ष, उलटतपासणी घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर, एल्गार परिषदेच्या आयोजकांपैकी एक असलेल्या हर्षाली पोतदार आणि पुण्याच्या विद्यमान निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना हजर राहण्याबाबत समन्स बजावण्यात आले आहे. कोरेगाव भीमा चौकशी आयोगाचे कामकाज शुक्रवारपासून (८ फेब्रुवारी) पुण्यात सुरू होत आहे. हे कामकाज १२ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या कालावधीत आंबेडकर, पोतदार आणि कदम यांची उलटतपासणी होणार आहे. कोरेगाव भीमा येथे सन २०१८ मध्ये झालेल्या हिंसाचाराबाबत पुराव्यांच्या नोंदीसाठी ही आयोगाची शेवटची सुनावणी असण्याची शक्यता आहे, त्यामुळे कोणतीही स्थगिती दिली जाणार नाही, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे या सुनावण्यांना महत्त्व आले आहे. हिंसाचार झाल्यानंतर आंबेडकर यांनी विविध आरोप केले होते. पोतदार या एल्गार परिषदेच्या आयोजकांपैकी एक आहेत, तर हिंसाचार झाला, तेव्हा कदम या हवेलीच्या उपविभागीय अधिकारी होत्या. आंबेडकर यांची उलटतपासणी ८ आणि ९ फेब्रुवारी, पोतदार यांची ९ आणि १० फेब्रुवारी, तर कदम यांची १२ फेब्रुवारी रोजी उलटतपासणी घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या नियोजनात काही बदल होऊ शकतात.

# ललित कला केंद्रात शाईफेक अन् तोडफोड

## नाटकावरुन अभाविपचे कार्यकर्ते आक्रमक

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे विद्यापीठात नाटकावरुन झालेल्या राड्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्ते आक्रमक झाले आहे. त्यांनी ललित कला केंद्राची तोडफोड केली आणि ललित कला केंद्राच्या बंद दरवाज्यावर शाईफेक करुन या कार्यकर्त्यांनी दरवाज्याच्या काचा फोडल्या. या सगळ्या प्रकारानंतर पोलिसांनी अभविपच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे. या ललित कला केंद्राच्या परिसरात सध्या मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. एकीकडे पुणे विद्यापीठात नाटकावरुन झालेल्या राड्यानंतर ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रविण भोळे यांच्यासह सहा जणांना नाटकाबाबत अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयाने सरकारी पक्षाची पोलीस कोठडीची मागणी फेटाळली आणि डॉ. प्रविण भोळे यांच्यासह आरोपी असलेल्या पाच विद्यार्थ्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे आरोपींना जामीन मिळवण्यासाठी लगेच अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मात्र हे सगळं घडत असताना ललित कला केंद्राच्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी ललित कला केंद्राच्या परिसरात मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चामध्ये थेट अभविपचे कार्यकर्ते आले त्यामुळे या परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातील विद्यार्थ्यांकडून 'जब वी मेट' हे प्रायोगिक नाटक काल सादर करण्यात आलं आहे. या नाटकात रामायणात काम करणाऱ्या नाट्य कलावंतांचे खाजगी आयुष्य दाखवण्यात आले होते. ललित कला केंद्राचा विद्यार्थी असलेल्या भावेष राजेंद्रे या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन केले होते. मात्र नाटकातील संवादांना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून आक्षेप घेण्यात आला आणि नाटक बंद पाडण्यात आले. त्यानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून नाटकाशी संबंधित व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर नाटकाचे दिग्दर्शक, काम करणारे कलावंत यांच्यासह ललित कला केंद्राचे प्रमुख डॉक्टर प्रविण भोळे यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने सरकारी पक्षाची पोलीस कोठडीची मागणी फेटाळली आणि डॉ. प्रविण भोळे यांच्यासह आरोपी असलेल्या पाच विद्यार्थ्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. या नाटकांत राम आणि सीता यांच्यासंदर्भात काही आक्षेपार्ह दृष्य दाखवण्यात आली होती. त्यामुळे हा सगळा राडा झाला.



### कला केंद्राच्या परिसरात मोर्चा

» या ललित कला केंद्राच्या परिसरात सध्या मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. एकीकडे पुणे विद्यापीठात नाटकावरुन झालेल्या राड्यानंतर ललित कला केंद्राचे प्रमुख डॉ. प्रविण भोळे यांच्यासह सहा जणांना नाटकाबाबत अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयाने सरकारी पक्षाची पोलीस कोठडीची मागणी फेटाळली आणि डॉ. प्रविण भोळे यांच्यासह आरोपी असलेल्या पाच विद्यार्थ्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. आरोपींना जामीन मिळवण्यासाठी लगेच अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मात्र हे सगळं घडत असताना ललित कला केंद्राच्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी ललित कला केंद्राच्या परिसरात मोर्चा आयोजित केला होता.

# जमीन मोजणीची अक्षांश, रेखांशासह प्रत मिळणार

## मोजणी नकाशामध्ये प्रत्येक हद्दीचे अक्षांश व रेखांश प्राप्त होत आहेत

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

भूमी अभिलेख विभागाकडून जमिनीची हद्द कायम करणे, पोटहिस्सा, सामिलीकरण, बिनशेती, कोर्टवाटप, कोर्टकमिशन आणि विविध प्रकल्पांसाठी भूसंपादन आदींसाठी मोजणीचे काम केले जात आहे. मोजणी झाल्यानंतर अर्जदारांना मोजणी नकाशाच्या 'क' प्रती पुरविल्या जातात. या मोजणी नकाशाच्या 'क' प्रतीमध्ये जागेवर प्रत्यक्ष मोजणी वेळी वहिवाटी किंवा ताब्याप्रमाणे अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या हद्दी दर्शवून योग्य परिमाणात संबधित टिपा नमूद मोजणी नकाशाची 'क' प्रत पुरविली जाते.भूमी अभिलेख विभागाने जमीन मोजणीसाठी 'ई-मोजणी' ही संगणक प्रणाली अद्ययावत केली असून आता ई-मोजणी २.० ही नवीन प्रणाली आणली आहे. त्यानुसार मोजणी प्रकरणांमध्ये जमीन मोजणीसाठी जीआयएस आधारीत रोव्हर्स मशीन या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी करण्यात येते. या मोजणी नकाशावर अक्षांश, रेखांश (कोर्डिनेट्स) असलेली जमीन मोजणीची 'क' प्रत उपलब्ध करून देण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यामुळे जमीन मोजणीनंतरही हद्दीवरून होणारे वाद उद्भवणार नाहीत. सद्य:स्थितीत जमीन मोजणीसाठी जी.आय. एस आधारीत रोव्हर्स व इलेक्ट्रॉनिक्स टोटल स्टेशन मशीन आदी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तसेच मूळ भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन व जिओ रेफरन्सिंग केलेल्या नकाशांचा वापर केला जात आहे. असे नकाशेच मोजणी नकाशा अंतिम करताना आधार नकाशा म्हणून वापर करण्यात येत आहे. ई मोजणी २.० या संगणक प्रणाली नंदूरबार, वाशिम जिल्ह्यांमध्ये तसेच इतर जिल्ह्यातील प्रत्येकी एका तालुक्यामध्ये लागू करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने ही संगणक प्रणाली संपूर्ण राज्यात लागू केली जाणार आहे. याबाबतचे आदेश महसूल विभागाचे सहसचिव संजय बनकर यांनी प्रसृत केले आहेत.

